# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्र.साअयो-२००४/प्र.क्र.१९९/ विसयो
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १२ जुलै,२००४

प्रस्तावना : दिनांक १४ जानेवारी,२००४ च्या शासन निर्णयानुसार संजय गांधी सामाजिक सहाय्य योजना समितीची रचना व अशा समित्यांचे गठण कशा पध्दतीने करावे याबाबत तसेच सामाजिक अर्थसहाय्य योजनांमधील लाभार्थी निवडीसाठी ग्रामसभा/प्रभाग समितीच्या संमतीने लाभार्थी निवडीची कार्यवाही करण्यासंदर्भात सविस्तर आदेश दिलेले होते. हा शासन निर्णय निर्गमित झाल्यावर संजय गांधी सामाजिक सहाय्य योजना समित्यांचे गठण होण्याची आवश्यकता होती, परंतु अशा समित्यांचे राज्यभरात गठण झाले नसल्याचे आढळून आले. लाभार्थी निवडीच्या संदर्भात ग्रामसभा/प्रभागसभा यांच्या संमतीची आवश्यकता असल्यामुळे, परंतु अशा सभांचे वेळेवर आयोजन होत नसल्याचे लक्षात आल्यामुळे लाभार्थी निवडीची प्रक्रीया अडून राहू नये म्हणून दिनांक १४ जानेवारी,२००४ च्या शासन निर्णयातील या दोन बाबींबाबत फेरविचार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

दिनांक १४ जानेवारी,२००४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील संजय गांधी सामाजिक सहाय्य योजना समित्यांचे गठण होईपर्यंत पूर्वीच्याच म्हणजे संजय गांधी निराधार योजना समित्या चालू ठेवण्यात याव्यात.

या योजनांमधील लाभार्थी निवडीसाठी शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या ग्रामसभा/प्रभाग समितीच्या मान्यतेची अट रद्द करुन पूर्वी प्रमाणेच आलेल्या अर्जांच्या छाननीनंतर समितीने लाभार्थीची निवड करावी. अशी निवड झाल्यावर संबंधित लाभार्थ्यास अर्थसहाय्य सुरु करण्यात यावे आणि अशा लाभार्थ्यांची यादी ग्रामसभा/प्रभाग सभेला सूचनार्थ पाठवावी आणि जर ग्रामसभेच्या,असे निदर्शनास आले की, काही व्यक्तींची चुकीची निवड झाली आहे अशा व्यक्तींची निवड निरस्त करण्याचा अधिकार ग्रामसभेला राहील.

सदर शासन निर्णय तात्काळ अंमलात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

१२/७/०४

( डॉ. मुन्शीलाल गौतम )
शासनाचे प्रधान सचिव.

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव

रोटा प्रिंट/एच-514(3000-7-04)1 64 C:\WINDOWS\Desktop\K COM.1

(कृ.मा.प.